रेग्यूलर दिवाणी मु.नं.२२०/११
लळुबाई गोफणे वि. बबन ठेंगील
CNR NO.MHST140014662011

## नि.१६२ खालील आदेश

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा नि.११० व १४६ वरील वादींचे ठसे शासकीय Forensic Lab Mumbai येथे हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतीवादीचे कथन की, याकामी नि.११० नुसार गाव कामगार तलाठी यांचेकडे वादी यांनी अर्ज दिला होता. सदर अर्जावर वादी नं.१ व प्रतिवादी क्र.१७ व १८ यांनी त्यांचे निशाणी अंगठे दिलेले आहेत. सदरचे आंगठे वादी यांनी नाकरलेले आहेत. त्यामुळे सदरचे आंगठे हे वादीचेच आहेत किंवा नाहीत याची हस्ताक्षर व ठसे तज्ञांकडुन तपासणी करुन घेणे आवश्यक व गरजेचे आहे. प्रतिवादी पुढे कथन करतो की, नि.१४६ सोबत रक्कम रु.२०/-चे स्टॅम्पपेपरवर वादी यांनी संमत्तीपत्र लिहुन दिलेले आहे. त्या संमत्तीपत्रावरसुध्दा वादी यांचेच आंगठे दिलेले आहेत. ते आंगठेसुध्दा वादी यांनी नाकरलेले आहेत. नि.११० व १४६ हे दोन्ही कागद पुराव्याचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. त्यामुळे एक्सपर्ट ओपिनियन घेणे गरजेचे झाले आहे. सदर प्रकरणातील वादी क्र.१ व प्रतिवादी नं.१७ व १८ यांच्या आंगठयाचे नमुने घेवुन तसेच सदर निशाणी ११० व १४६ यावरील आंगठयाचे नमुने शासकीय हस्तरेषा तज्ञ व ठसे तज्ञ यांचे Forensic Lab ला पाठवुन त्याची सत्यता पडताळुन पाहणे आवश्यक व गरजेचे झाले आहे. त्यासाठी प्रतिवादी खर्च करण्यास तयार आहे. तज्ञांकडे पाठविलेस वादी यांचे कुठलेही नुकसान होणार नाही व न्यायदानास मदत होईल म्हणुन अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतचे अर्जास आक्षेप घेतला असुन त्यानी त्यांचे म्हणणे नि.१६४ अन्वये दाखल केले आहे. वादीचे म्हणणे की प्रस्तुतचा अर्ज हा खोटा व लबाडीचा व बेकायदेशीर असुन फेटाळणेस पात्र आहे. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी पश्चात

बुध्दीने दाखल केला आहे. दावा हा अंतिम निकालाचे टप्प्यावर आला असताना केवळ दावा हा निकाली निघु नये म्हणुन प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. नि.११० व १४६ या कागदपत्राबाबत वादी यांनी दावा दाखल करताना नमुद केली होती. प्रतिवादी यांना त्याबाबतीतचे ज्ञान होते. तरीदेखील त्यांनी हस्ताक्षर तज्ञाकडे अर्ज पाठविणेबाबत संधी असतानादेखील त्यावेळी पाउले उचलेली नाहीत. त्याबाबत अर्जातदेखील स्पष्टीकरण दिलेले नाही. प्रतिवादी यांनी दाव्याचे कामी स्वतःचे तसेच महसुल अधिकारी व अन्य साक्षीदार यांचे पुरावे नोंदविले आहेत. अशावेळी तोंडी कागदपत्रे पुराव्याची छाननी करणेस न्यायालय सक्षम असताना पुन्हा हस्ताक्षर तज्ञांची प्रतिवादी यांना गरज कशी वाटते याचे स्पष्टीकरण अर्जात नमुद केलेले नाही. भारतीय पुरावा कायदा कलम ६७ मधील तरतुदीनुसार प्रतिवादी यांचे वतीने साक्षीदारांचे निशाणी ११० व १४० या दस्तऐवजासंबंधी साक्षीपुरावे नोंदविलेले आहेत. त्याकामी कागदपत्रांचे मोजमाप अंतिम न्यायनिर्णयाचेवेळी केले जाणार असलेने केवळ न्यायदानास अडथळे करण्याचे हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. म्हणुन अर्ज खर्चासह नामंजुर करावा म्हणुन विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र.१७ व १८ यांना वेळोवेळी संधी देवुनदेखील त्यांन त्यांचे म्हणणे दाखल केले नाही म्हणुन प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१७ व १८ यांचेविरुध्द विना म्हणणे चालविणेत आला.

५. अर्ज वाचला युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे त्यांचे हक्काप्रमाणे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेसाठी तसेच हस्तांतराचे व्यवहार हे वादींचे हिश्यावर बंधनकारक नाहीत म्हणुन जाहीर ठराव होवुन मिळणेसाठी प्रतिवादींचेविरुध्द दाखल केला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता दावा हा १० वर्षे जुना असुन वादी व प्रतिवादी यांचेतर्फे साक्षीपुरावा हा झालेला आहे. प्रतिवादींनी अदयापपावेतो पुरावा हा बंद केला नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांनीच नि.११० या दस्तऐवजावरील साक्षीदार नि.११२ अन्वये तपासणेत आलेला आहे.

तसेच नि.१४६ स्टॅम्प यावरील साक्षीदार बबन विठोबा ठेंगे यांचेदेखील साक्ष प्रतिवादींनी नोंदविलेली आहे. तसेच सदर दस्तऐवजावरील साक्षीदार महादेव विठोबा ठेंगे यांचेदेखील साक्ष प्रतिवादींनी नोंदविलेली आहे. भारतीय पुरावा कायदा कलम ४५ नुसार *Opinions of experts- When the court has to form an opinion upon point of foreign law, or of science or art, or as to identify of handwriting or finger impressions the opinions upon that point of persons specially skilled in such foreign law, science or art or in questions as to identify of handwriting or finger impressions are relevant facts.*

*Illustration C- The question is, whether certain document was written by A. Another document is produced which is proved or admitted to have been written by A. Opinion on the question whether the two documents were written by same person or by different person are relevant.*

वरील उदाहरणानुसार दस्तऐवजाबाबत संदिग्धता असेल व सबंधीत दस्तऐवज दाखल करण्यात आले असेल त्यावेळी न्यायालय Expert opinion घेवु शकते. प्रतिवादींच्या अर्जानुसार केवळ वादी यांनी दस्तऐवजावरील आंगटे नाकरले म्हणुन त्याबाबत हस्ताक्षर तज्ञांकडे अहवालासाठी पाठविणे हे सध्य सिथतीत गरजेचे वाटत नाही. प्रतिवादींनी दस्तऐवज शाबीत करणेसाठी ज्यांनी दस्तऐवज लिहला त्याची साक्ष तसेच दस्तऐवजावरील साक्षीदार यांची साक्ष नोंदविलेली आहे. त्यामुळे केवळ वादीने दस्तऐवजावरील आंगठे नाकारले म्हणुन हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल घ्यावा ही मागणी सध्य स्थितीत मंजुर करणे योग्य होणार नाही. दावा हा १० वर्षे जुना असुन प्रतिवादीने दाखल केलेले अर्जामुळे प्रतिवादीतर्फे उर्वरीत पुराव्यासाठी प्रलंबीत आहे. म्हणुन अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

फलटण.　　　　　　　　　　(पं. हि. पाटील)
ता.२४/२/२०२३.　　　　३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर फलटण.